N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** भद्रावती **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0099 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/04/2021 21:03 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/04/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/04/2021

**Time From (वेळेपासून):** 11:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/04/2021 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 039 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/04/2021 21:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय भद्रावती,भद्रावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विश्वास रामचंद्र पिंपळकर वय29वर्ष

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बाबुपेठ वार्डनं2चंद्रपुर ,चंद्रपुर,भद्रावती,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बाबुपेठ वार्डनं2चंद्रपुर ,चंद्रपुर,भद्रावती,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9623141942

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत नरेंद्रप्रतापसिंग बैस मंडळ अधि त कार्या भद्रावती | | | 1. द्वारकानगरी वरोरा ,वरोरा ,भद्रावती, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराचे 3नोटा एकुण 1500 | 1,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,500.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक- 01/04/2021 मी विश्वास रामचंद्र पिपळकरं, वय 29 वर्षे, व्यवसाय-खाजगी काम रा.बाबुपेठ वार्ड क्र 2 मोठया सवारी बंगल्याजवळ ता. जिल्हा चंद्रपूर असा असून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी राहतो व खाजगी काम करतो. मी ऑक्टोबर 2020 मध्ये राजेश बाबुराव भलमे व अनिल महादेव ढेगंळे यांचेकडुन साजा चंदनखेडा मौजा चरूर घारापुरी येथील सर्वे न.129/2 मधील 1 हेक्टर 62 आर जमीन हि विकत घेतली.सदर जमीन खरेदीचे रीतसर रजिस्टरी झालेली आहे. सदर खरेदी केलली जमीन माझे नावे (फेरफार) करण्याकरीता साजा चंदनखेडा येथील तलाठी यांना रजिस्टर पोस्टाने अर्ज पाठविला व त्यांनतर आठ दिवासानी मी मौजा चंदनखेडा तलाठी यांना प्रत्यक्ष भेटुन माझे फेरफार बाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी तुमचे काम करून देते असे म्हणाले त्यांनतर बरेच दिवस झाले तरी माझी फेरफार झाले नाही म्हणुन मी मौजा चंदनखेडा येथील महिला तलाठी अलाम मडम ला भेटलो असता त्यांनी त्याचेकडील माझे फेरफार चे काम पुर्ण झाले असुन पुढिल कार्यवाहीसाठी कागदपत्रे मंडळ अधिकारी बैस यांचेकडे गेले असल्याचे सागितल्याने मी काल दिनांक 31/03/2021 रोजी चे अंदाजे दुपारचे 04:00 वा दरम्यान तहसिल कार्यालय भद्रावती येथे जावुन मंडळ अधिकारी बैस यांना भेटलो व माझे जमीनीचे फेरफार करण्याच्या कामाबाबत विचारले असता,मंडळ अधिकारी बैस यांनी मला माझे फेरफारचे काम करून देण्याच्या कामासाठी 2,000/-रू लाचेची मागणी केली तेव्हा मी त्यांना म्हटले कि,माझ्याकडे आता 2,000/- रू नाही आहे.तेव्हा त्यांनी मला म्हटले कि, 2,000/- रू द्यावेच लागतील नाहीतर तुझे फेरफार चे काम करून देणार नाही असे मंडळ अधिकारी बैस यांनी मला म्हणाल्याने मी त्यांना नारईलाजास्तव होकार देवून 2000/- रू उदया दिनांक 01/04/2021 रोजी आणुन देतो असे म्हणुन तेथुन निघुन आलो.माझी लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी आज दिनांक 01.04.2021 रोजी सकाळी 11.30 वाजताचे दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील श्री. भामरे सा. यांना भेटुन वरील हकीकत सांगितली व मी वरील प्रमाणे लेखी तक्रार देत आहे. माझा श्री. बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. तरी माझे तक्रारीवरुन मला माझे साजा चंद्रनखेडा मौजा चरूर घारापुरी येथील सर्वे न. 129/2 मधील 1 हेक्टर 62 आर जमीनीचे फेरफार करून देण्याचा कामाकरीता लाच मागणारे श्री.बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांचेविरुध्द कार्यवाही होण्याकरीता लाच रक्कम म्हणुन आवश्यक असलेली माझे बचतीतुन जमा झालेले 2,000/- रू. आपणाकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे तरी त्याचे विरूध्द कार्यवाही होणेस विंनती आहे.त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. अविनाश भामरे,साहेब यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या स्टफची ओळख करुन देउन पो.क रोशन चांदेकर यांना दोन पंच घेवुन येण्याबाबत पत्र. दिले व त्यांनी उप अधिक्षक कार्यालय भुमी अभिलेख चंद्रपूर येथुन दोन पंचे आणल्यांनतर पोलीस उप अधिक्षक श्री. अविनाश भामरे,साहेब यांनी दोन्ही पंचाना स्टफची ओळख,करून देउन त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री. अविनाश भामरे,साहेब यांनी

दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माया सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री. अविनाश भामरे,साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. अविनाश भामरे,साहेबयांनी दिलेल्या सुचने वरुन नापोक. अजय बागेसर यांनी व्हईस रेकर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. अविनाश भामरे,साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. अविनाश भामरे,साहेब यांनी माझेकडुन सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 2,000/- (रू.500/- दराच्या 04 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रसिन पावडर लावुन सदर नोटा एका लिफापा टाकुन पंचासमक्ष सिलबंद केले व श्री भामरे साहेब यांनी लिफाफा स्वता:चे ताब्यात ठेवला.लाच-लुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपूर येथून शासकीय वाहनाने व माझे मोटार सायकलने आम्ही भद्रावती येथे आलो. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.अविनाश भामरे,साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन नापोक. अजय बोगसरे यांनी व्हईस रेकर्डर सुरु करून व्हईस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकलने पंच क्र. 01 सह तहसिल कार्यालय भद्रावती येथे पडताळणी करीता पाठविले असता पडताळणी दरम्यान बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांनी मला रू. तडजोडीअंती 1,500/- घेवुन त्यांचे तहसिल कार्यालय भद्रावती येथे बोलाविले. लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हर्इस रेकर्डर बंद करण्यात आले.त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.अविनाश भामरे, साहेब यांनी पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष व्हर्इस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि. चंद्रपूर यांनी माझे साजा चंदनखेडा मौजा चरूर घारापुरी येथील सर्वे न.129/2 मधील 1 हेक्टर 62 आर जमीनीचे फेरफार करून देण्याचा कामाकरीता तडजोडीअंती 1,500/-रु. लाच रकमेची मागणी करून थोडयाच वेळात लाच रक्कम 1500/- रु. स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी मला अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळयातून दुप्पटा काढुन डावे हातातच ठेवून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.अविनाश भामरे,साहेब यांचे सुचनेवरुन नापोक. अजय बागेसर यांनी व्हर्इस रेकर्डर सुरु करून व्हर्इस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हार्इस रेकर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकलने पंच क्र. 01 यांचेसह भद्रावती तहसिल कार्यालयात जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 भद्रावती तहसिल कार्यालयात गेलो असता तिथे श्री.बैस मंडळ अधिकारी हे हजर होते. त्यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी 1,500/-रु. लाचेची रक्कमेची मागणी केली. त्यावरून मी अँथ्रसिन पावडर लावलेल्या 1,500/-रु. रक्कम माझे शर्टच्या डाव्या खिश्यातुन काढुन श्री.बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांना दिल्या असता श्री.बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांनी लाच रक्कम 1,500/-रु. रु. आपल्या उजव्या हाताने घेवुन मोजुन त्यांचेकडे फुल पन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर मी त्यांना सर उदया होवुन जार्इल न सर लवकर करून दया सर असे म्हटले असता त्यांनी हो करतो असे म्हटले त्यानंतर मी त्यांना ठिक आहे असे म्हटले असता गै.अ.बैस यांनी किती सवै नंबर आहे असे म्हटले.त्यानंतर मी बाहेर येवुन सापळा पथकास माझे गळयातील दुप्पटा डावे हाताने काढून डावे हातातच ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने बैस मंडळ अधिकारी,तहसिल कार्यालय भद्रावती जि.चंद्रपूर यांना रंगेहात पकडुन पुढील कारवार्इ केली. तरी प्रशांत नरेंद्रप्रतापसिंह बैस ,वय 51 वर्षे मंडळ अधिकारी तहसिल कार्यालय भद्रावती जिल्हा चंद्रपूर यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून माझे साजा चंद्रनखेडा मौजा चरूर घारापुरी येथील सर्वे न.129/2 मधील 1 हेक्टर 62 आर जमीनीचे फेरफार करून देण्याचा कामाकरीता तडजोडीअंती 1,500/-रु. लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करून माझेकडुन लाचेची रक्कम 1,500/-रु. स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.सदरची कार्यवाही ही दिनांक 01/04/2021 चे 11:30 वा.ते दिनांक 01/04/2021 रोजी 16:10 वा दरम्याण करण्यात आली आहे.माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SANTOSH SUBHASH MASKE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

01/04/2021

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SANTOSH SUBHASH MASKE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अमलदार
पो.स्टे.भद्रावती

9151029

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**